वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज ™




पिंपरीत बेकायदा गॅस रिफिलिंगचा स्फोटक धोका

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 04 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दिल्लीत ९ जणांचा मृत्यू; जळालेल्या आईच्या मिठीत होता मुलाचा मृतदेह

# दिल्लीत एसी ब्लास्टमुळे अग्नितांडव!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**देशाची राजधानी दिल्ली पुन्हा एकदा आगीच्या तांडवाने हादरली आहे. विवेक विहार परिसरात एसीच्या स्फोटामुळे लागलेल्या आगीत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला. यामध्ये एकाच कुटुंबातील ५ सदस्यांचा समावेश असून, बचावकार्यादरम्यान समोर आलेलं दृश्य पाहून उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आलं.**

शनिवार-रविवारची ती रात्र विवेक विहारमधील बी-ब्लॉकसाठी काळरात्र ठरली. गाढ झोपेत असताना झालेल्या एका एसी ब्लास्टने हसत्या-खेळत्या जैन कुटुंबाचा अंत केला. या भीषण अग्निकांडात ९ जणांनी जीव गमावला, पण त्यात दीड वर्षांच्या चिमुरड्या आरूचा आणि त्याच्या आईचा झालेला अंत पाहून सुन्न व्हायला होतं. जेव्हा बचाव पथक घरात शिरलं, तेव्हा निष्पाप आरूचा मृतदेह त्याच्या आईच्या, आंचलच्या छातीला घट्ट बिलगलेला होता. मृत्यूच्या दारातही आईने आपल्या पोटच्या गोळ्याला वाचवण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला, पण नियतीला काही दुसरंच मान्य होतं.





## मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त



दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. ९ निष्पाप जीवांचा मृत्यू ही अत्यंत हृदयद्रावक घटना असल्याचं सांगत त्यांनी पीडित कुटुंबांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत. प्रशासनाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले असून, घरामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात आग कशी पसरली, याचा तपास केला जात आहे.

## "भैया वाचवा..." निशांकचा शेवटचा कॉल

पहाटे ३ च्या सुमारास अचानक एसीचा भीषण स्फोट झाला आणि पाहता पाहता घराचं रूपांतर आगीच्या गोळ्यात झालं. घरातून बाहेर पडण्याचे सर्व रस्ते बंद झाले होते. अशा परिस्थितीत मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना निशांकने आपला भाऊ दीपकला व्हिडिओ कॉल केला. "भैया, आम्हाला वाचवा... घरात आग लागली आहे," ही निशांकची शेवटची हाक होती. त्यानंतर संपर्क तुटला आणि काही क्षणांतच संपूर्ण कुटुंब आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं. मृतदेह इतके जळले आहेत की त्यांची ओळख पटवणंही कठीण झालं असून, डीएनए नमुने घेण्यात आले आहेत.

## वाढदिवसाचा आनंद शोकात बदलला

या घटनेत अरविंद जैन (६२), अनिता जैन, मुलगा निशांक (३४), सून आंचल आणि नातू आरू यांचा करुण अंत झाला. विशेष म्हणजे, रविवारी निशांकचा भाऊ दीपक जैन यांच्या तीन वर्षांच्या मुलाचा वाढदिवस होता. वाढदिवस साजरा करण्यासाठी दीपक यांचे कुटुंब मानेसरला गेले होते. निशांकची तब्येत ठीक नसल्याने तो घरीच थांबला होता. रात्री १२ वाजता दोन्ही भावांनी व्हिडिओ कॉलवर केक कापून आनंद साजरा केला, पण अवघ्या तीन तासांत या आनंदाची जागा किंकाळ्यांनी घेतली.

## मृतांमध्ये एकाच कुटुंबातील अनेक जण

दुसऱ्या मजल्यावर अरविंद जैन (६०), त्यांची पत्नी अनिता जैन (५८), मुलगा निशांत जैन (३५), सून अंचल जैन (३३) आणि नातू आकाश जैन यांचे मृतदेह सापडले. तर, तिसऱ्या मजल्यावर नितीन जैन (५०), त्यांची पत्नी शैले जैन (४८) आणि मुलगा सम्यक जैन (२५) हे मृतावस्थेत आढळले. पहिल्या मजल्यावर शिखा जैन (४५) मृतावस्थेत आढळल्या. तर, पती नवीन जैन (४८) जखमी आहेत.



## कोळसा झाला... कोण कुठला, डीएनए सांगेल

दिल्ली पोलिसांनुसार, इमारतीच्या पहिल्या मजल्यावर एक, दुसऱ्या मजल्यावर पाच आणि बंद असलेल्या जिन्यावर तीन मृतदेह आढळले. आग लागल्यानंतर लोकांनी जीव वाचवण्यासाठी छतावर जाण्याचा प्रयत्न केला. पण छताच्या दरवाज्याला कुलूप होते. त्यामुळे ते तिथेच अडकले. बहुतेक मृतदेह इमारतीच्या मागील भागात सापडले. काही नागरीक इतक्या मोठ्या प्रमाणात जळाले की त्यांची ओळख पटवणे कठीण झाले आहे. डीएनए चाचणीनंतर त्यांची ओळख पटेल.

# वाघोली दळणवळणाला मिळणार गती!

## लेक्सिकॉन स्कूल–म्हसोबा मंदिर रस्त्यासाठी ८.१७ कोटी; 'मिसिंग लिंक' पूर्ण होणार

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या वाघोली परिसरातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पालिकेने आता कंबर कसली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या आणि वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत कळीच्या मानल्या जाणाऱ्या 'लेक्सिकॉन स्कूल ते म्हसोबा मंदिर ते केसनंद रोड' या १८ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी स्थायी समितीने अतिरिक्त ८.१७ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. यामुळे या भागातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार असून आय.व्ही. इस्टेट परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे.**




या रस्त्याच्या विकासासाठी महापालिकेकडे सुरुवातीला केवळ १.५० कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध होती. मात्र, प्रकल्प अहवालानुसार या कामाचा एकूण खर्च सुमारे ९.६७ कोटी रुपये इतका अपेक्षित आहे. अतिरिक्त निधीची उपलब्धता नसल्याने कामात अडथळा निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७२ (ब) नुसार स्थायी समितीने मुख्य सभेची मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. प्रशासनाने केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत या मार्गावर अनेक तांत्रिक अडचणी समोर आल्या आहेत. नगर रोडजवळील या रस्त्याच्या मार्गावर काही ठिकाणी जमीन दलदलयुक्त असून मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे, रस्त्याच्या मूळ पातळीत ४ ते ५ मीटरपर्यंत तफावत असल्याचेही सर्वेक्षणात आढळले आहे. या गंभीर भौगोलिक परिस्थितीवर मात करण्यासाठी साध्या रस्ते बांधणीपेक्षा विशेष तांत्रिक उपाययोजनांची आवश्यकता आहे. यासाठी 'मे. इंफ्राकिंग कन्सल्टिंग इंजिनिअर्स प्रा. लि.' या तज्ञ सल्लागार संस्थेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात आला आहे. त्यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली हे काम झाल्यास रस्ता दर्जेदार होईल आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास पथ विभागाने व्यक्त केला आहे.

> वाघोलीतील नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता, तेथील अंतर्गत रस्ते सक्षम करणे ही काळाची गरज आहे. लेक्सिकॉन स्कूल ते म्हसोबा मंदिर हा रस्ता या भागातील वाहतुकीचा कणा ठरेल. तांत्रिक अडचणी असल्या तरी योग्य निधी उपलब्ध करून हे काम मार्गी लावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> – **श्रीनाथ भिमाले**, अध्यक्ष, स्थायी समिती, पुणे महापालिका.

### वाहतूक कोंडी फुटणार

वाघोलीतील नगररोड ते आय.व्ही. इस्टेट दरम्यानचा हा मार्ग सध्या एका 'मिसिंग लिंक'सारखा आहे. हा १८ मीटरचा रस्ता पूर्ण झाल्यास नगररोडवरून थेट अंतर्गत भागात जाणे सोपे होईल. सध्या वाघोलीत वाढत्या शहरीकरणामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. केसनंद रोड आणि नगररोडवरील वाहतूक विभागली गेल्यामुळे मुख्य चौकांमधील कोंडी कमी होण्यास मदत होईल. उपलब्ध १.५० कोटी रुपयांच्या निधीच्या जोरावर एकूण ९.६७ कोटी रुपयांच्या कामासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव प्रशासनाने ठेवला आहे. स्थायी समितीच्या मान्यतेनंतर आता हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मुख्य सभेकडे धाडण्यात आला आहे. एकदा का प्रशासकीय आणि वित्तीय सोपस्कार पूर्ण झाले की, या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होईल.

---

# नोटाबंदीच्या काळात जप्त झालेले २ लाख रुपये १० वर्षांनंतर परत मिळणार

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील बिबवेवाडी येथे राहणारे सिव्हिल इंजिनिअर आणि कंत्राटदार गिरीश रमेशचंद्र मलानी यांच्यासाठी नोटाबंदीची ही गोष्ट एका 'हॅप्पी एंडिंग'सारखी आहे. २०१६ मध्ये जप्त करण्यात आलेले त्यांचे २ लाख रुपये (५०० च्या जुन्या नोटा) आता त्यांना नवीन चलनात परत मिळणार आहेत.**





१ डिसेंबर २०१६ रोजी मलानी आपली बहीण सोनल सोनी यांच्यासोबत माहूरच्या रेणुका देवी मंदिरात जात होते. त्यांच्याकडे ५०० रुपयांच्या ४०० नोटा (एकूण २ लाख रुपये) होते. हे पैसे त्यांच्या व्यवसायाचे होते आणि सरकारनं दिलेल्या ३० डिसेंबरच्या मुदतीपूर्वी ते अकोल्यातील बँक खात्यात जमा करणार होते. मात्र, नांदेड जिल्ह्यातील माहूर जवळ निवडणुकीच्या तपासणी नाक्यावर पोलिसांनी त्यांची गाडी अडवली. निवडणुकीचा काळ असल्याने इतकी रोकड नेता येणार नाही, असे सांगत पोलिसांनी हे पैसे जप्त केले.

प्राप्तीकर विभागाने चौकशी केल्यानंतर मलानी यांनी दिलेली कागदपत्रे वैध ठरली आणि २८ डिसेंबर २०१६ रोजी त्यांना क्लीन चिट मिळाली. मात्र, कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होऊन पैसे हातात मिळेपर्यंत ३१ डिसेंबर उजाडला होता. बँकांमध्ये जुन्या नोटा बदलण्याची मुदत आदल्या दिवशीच (३० डिसेंबर) संपली होती. मलानी यांनी आरबीआय (RBI) कडे धाव घेतली, पण नियमांचे कारण देत आरबीआयने पैसे बदलून देण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली.



### न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके आणि न्यायमूर्ती निवेदिता पी. मेहता यांच्या खंडपीठाने मलानी यांच्या बाजूने निकाल दिला. "सरकारी यंत्रणेच्या दिरंगाईमुळे मलानी यांना त्यांचे कायदेशीर पैसे जमा करण्यापासून वंचित ठेवता येणार नाही", असे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने आरबीआयला आदेश दिला की, त्यांनी या नोटांची पडताळणी करून आठ आठवड्यांच्या आत मलानी यांना २ लाख रुपये वैध चलनात द्यावेत. "सत्याचा विजय होतो यावर माझा विश्वास बसला, पण न्याय मिळायला खूप उशीर झाला", अशी भावना मलानी यांनी व्यक्त केली. पैसे परत मिळाल्यानंतर ते सर्वात आधी मंदिरात जाऊन ५,००० रुपयांचे अन्नदान करणार आहेत. या अनुभवानंतर आता निवडणुकीच्या काळात ५०,००० रुपयांपेक्षा जास्त रोख रक्कम सोबत न नेण्याची खबरदारी ते घेतात.

# भाडेकरूंची माहिती लपवणे घरमालकांना पडले महागात!

## पिंपरी-चिंचवड पोलीस 'ॲक्शन मोड'वर! : शहरात ३८ जणांवर गुन्हे दाखल

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृतपणे राहणाऱ्या व्यक्ती आणि सुरक्षेच्या कारणास्तव घरमालकांना भाडेकरूंची माहिती देणे बंधनकारक असतानाही, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कडक पाऊल उचलले आहे. एप्रिल २०२६ मध्ये राबविलेल्या विशेष मोहिमेत माहिती न देणाऱ्या ३८ घरमालकांवर गुन्हे दाखल करण्यात आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.**




### कारवाईतील पथक...

ही यशस्वी कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड आणि पोलीस उपायुक्त प्रदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली एटीबी आणि एटीसीच्या पथकाने केली आहे.

### 'एसीबी' आणि 'एटीसी'ची संयुक्त मोहिम

शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि अनधिकृतपणे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांचा शोध घेण्यासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शोध मोहीम राबविण्यात आली. दहशतवाद विरोधी शाखा (ATB) आणि पोलीस स्टेशन स्तरावरील दहशतवाद विरोधी कक्ष (ATC) यांनी आयुक्तालय क्षेत्रात भाडेकरूंची सखोल पडताळणी केली. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ च्या कलम १६३ नुसार ही माहिती देणे बंधनकारक असून, नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता-२०२३ च्या कलम २२३ नुसार कारवाई करण्यात आली आहे.

### माहिती न दिल्यास कायदेशीर कारवाई – उपायुक्त प्रदीप जाधव

पोलीस उपायुक्त (विशेष शाखा) प्रदीप जाधव यांनी या मोहिमेबाबत माहिती देताना सांगितले की, सर्व घरमालकांनी आपल्याकडे राहणाऱ्या भाडेकरूंची कागदपत्रे आणि माहिती जवळच्या पोलीस स्टेशनला देऊन पडताळणी करून घेणे अनिवार्य आहे. जर माहिती दिली नाही, तर संबंधित घरमालकावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, परिसरात कोणी संशयित व्यक्ती किंवा अनधिकृत बांगलादेशी नागरिक राहत असल्यास त्याची माहिती चिंचवड येथील दहशतवाद विरोधी शाखेला द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे. माहिती देणाऱ्या नागरिकांचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# पिंपरीत बेकायदा गॅस रिफिलिंगचा स्फोटक धोका

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

शहरात बेकायदा गॅस रिफिलिंगचा धोकादायक उद्योग थांबत नसल्याचे दिसून येत आहे. घरगुती गॅस सिलिंडरमधील गॅस बेकायदा व्यावसायिक वापरासाठी किंवा लहान सिलिंडरमध्ये भरून विक्री करण्याचे प्रकार अनेक भागांत सुरू आहेत. पोलिसांकडून कारवाई होत असली तरी अवैध गॅस रिफिलिंगची 'गळती' सुरूच आहे.

गॅस शेगडी दुरुस्तीची दुकाने, गॅरेज किंवा छोट्या दुकानांमधून हा अवैध धंदा प्रामुख्याने चालवला जातो. घरगुती सिलिंडरमधील गॅस नलिका, ॲडॅप्टर किंवा इतर उपकरणांच्या सहाय्याने दुसऱ्या सिलिंडरमध्ये भरला जातो. व्यावसायिक गॅसपेक्षा स्वस्त दरात हा गॅस हॉटेल, ढाबे, फेरीवाले, चहाच्या टपऱ्यांना विकला जातो. मात्र, स्वस्त गॅसच्या आमिषाला बळी पडून नागरिक स्वतःच धोका ओढवून घेत आहेत.



> अवैध गॅस रिफिलिंगचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जात आहे. मागील काही दिवसांत गुन्हे देखील दाखल झाले आहेत. यापुढेही ही कारवाई सुरूच राहणार आहे. असे प्रकार आणखी कुठे सुरू असल्यास नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> **- डॉ. शिवाजी पवार, पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा**

### काही घटना

ताथवडे येथे मागील वर्षी एका महाविद्यालयाच्या बाजूच्या मोकळ्या मैदानात टँकरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरताना गळती होऊन आग लागली, त्यामुळे पाठोपाठ आठ ते दहा स्फोट झाले. चाकण जवळही असाच प्रकार घडला. गॅस रिफिलिंग करताना टँकरजवळ आग लागल्याने भीतीचे वातावरण पसरले. चिखली येथे काही वर्षापूर्वी गॅस शेगडी दुरुस्तीच्या दुकानात स्फोट झाल्याने छोट्या सिलिंडरची लोखंडी रिंग डोक्यात पडून एकाचा मृत्यू झाला.

### संभाव्य धोके

- गॅस गळती होऊन आग लागणे
- रिफिलिंगच्या ठिकाणी स्फोटाची शक्यता
- जीवितहानी आणि मालमत्तेचे नुकसान
- अरुंद गल्ल्या आणि दाट लोकवस्त्यांमुळे बचावकार्य कठीण

# हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो 'या' दिवशी धावणार? १५ मे च्या बैठकीकडे लक्ष

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) हाती घेतलेल्या माण- हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोच्या कामाला आता मोठी गती मिळाली असून, या मेट्रोचा पहिला टप्पा ३१ मेपर्यंत प्रवाशांसाठी खुला करण्याची तयारी सुरू आहे. या मार्गावरील १२ स्थानकांचे काम पूर्णत्वास आले असून, येत्या १५ मे रोजी होणाऱ्या टाटा आणि पीएमआरडीएच्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत मार्ग कार्यान्वित होण्यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल.**



हिंजवडी आयटी हबमधील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मैलाचा दगड ठरणाऱ्या या प्रकल्पाकडे संपूर्ण पुणेकरांचे लक्ष लागले आहे. सध्या माण-हिंजवडी ते बालेवाडी दरम्यानच्या १२ स्थानकांचे स्थापत्य काम ९५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले असून, केवळ किरकोळ दुरुस्ती आणि शेवटच्या टप्प्यातील सजावटीची कामे वेगाने सुरू आहेत. तांत्रिक चाचण्या आणि प्रवासी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या सुविधांची पडताळणी युद्धपातळीवर सुरू असून, मे अखेर हा मार्ग कार्यरत होण्यासाठी सज्ज करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. १५ मे रोजी होणारी बैठक या प्रकल्पाच्या दृष्टीने निर्णायक मानली जात आहे. यामध्ये पीएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी आणि टाटा समूहाचे प्रतिनिधी प्रत्यक्ष कामाचा सविस्तर आढावा घेणार आहेत.

३१ मेपर्यंत ही सेवा कार्यान्वित झाली, तर बालेवाडी स्टेडियमपर्यंत प्रवास करणाऱ्या हजारो आयटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, हिंजवडी परिसरातील रस्त्यांवरील वाहनांवरील ताण लक्षणीयरीत्या कमी होईल.

# कोणाची बाजी कोणाला हादरा?






**पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल ४ मे रोजी जाहीर होत असून, या निकालांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आपली घोडदौड कायम राखते का, की विरोधकांना नवी संधी मिळते, याचे उत्तर या निवडणुकांतून मिळणार आहे. हे निकाल केवळ संबंधित राज्यांपुरते मर्यादित न राहता राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरवणारे ठरू शकतात.**

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ आणि आसाम या राज्यांतील निवडणुका विशेष महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. त्यातही पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्ष आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील थेट संघर्ष हा राष्ट्रीय चर्चेचा विषय ठरला आहे. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस आणि नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप यांच्यातील ही लढत प्रतिष्ठेची बनली आहे.

या निवडणुकांमध्ये वाढलेले मतदान हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे. पश्चिम बंगालमध्ये तब्बल ९३ टक्के मतदान झाले, तर आसाम, तामिळनाडू आणि केरळमध्येही उच्च मतदानाची नोंद झाली. मात्र वाढलेले मतदान म्हणजे सत्ताधाऱ्यांविरोधातील लाट असे सरसकट समीकरण लावणे चुकीचे ठरेल. मतदानाच्या वाढीमागे मतदारयाद्यांतील नाव वगळले जाण्याची भीती, स्थलांतरित मतदारांचे मोठ्या प्रमाणात परतणे आणि राजकीय ध्रुवीकरण यांसारखी अनेक कारणे आहेत.

आसाममध्ये हिमंत बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील भाजपसमोर सत्ता टिकवण्याचे आव्हान आहे. येथे निकाल भाजपच्या बाजूने लागल्यास त्यांचा प्रभाव अधिक दृढ होईल; अन्यथा तो मोठा राजकीय धक्का ठरू शकतो. तामिळनाडूमध्ये द्रमुक आघाडीला आघाडी मिळण्याची शक्यता व्यक्त होत असली तरी विरोधकांची फूट ही निर्णायक ठरू शकते. केरळमध्ये सत्तांतराची चिन्हे दिसत असून युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट आघाडीला संधी मिळण्याची शक्यता आहे.

एकूणच, या निवडणुकांचे निकाल केवळ सत्ता कोणाच्या हाती जाते यापुरते मर्यादित नसून, देशातील राजकीय समीकरणे, आघाड्या आणि नेतृत्व यांची नव्याने मांडणी करणारे ठरणार आहेत. विशेषतः पश्चिम बंगालमधील निकालावरून भाजपच्या विस्तार धोरणाला कितपत यश मिळते आणि ममता बॅनर्जी यांचे प्रादेशिक नेतृत्व राष्ट्रीय स्तरावर किती प्रभावी ठरते, हे स्पष्ट होईल.

अखेर, ४ मेनंतरचे चित्र भारतीय राजकारणासाठी निर्णायक ठरणार आहे. मतदारांनी दिलेला कौल हा केवळ सत्तांतराचा नसून, भविष्यातील राजकीय दिशादर्शक ठरणार आहे.

## प्रासंगिक »

### वेळेचे महत्त्व

**एक स्वार आपल्या घोड्याला खरारा करून त्याच्यावर खोगीर घालत असता घोड्याच्या एका पायाच्या नालाचा एक खिळा सुटून पडला आहे असे त्याला दिसले.**

पण तेथे दुसरा खिळा बसविण्याचे काम त्याने मागे टाकले. काही वेळाने लढाईवर जाण्याचे इशारे देण्याचे शिंग वाजू लागताच तो स्वार आपल्या घोड्यावर बसून लढाईच्या जागेकडे निघाला.

त्या फौजेच्या सेनापतीने हुकूम सोडला की, 'सर्वांनी आपले घोडे भरधाव सोडून शत्रूंवर तुटून पडावे व त्यांचा पाठलाग करावा.'

हुकमाप्रमाणे तो स्वार आपला घोडा उडवीत चालला असता खिळा पडल्यामुळे सैल झालेला घोड्याचा नाल गळून पडला व त्यामुळे घोडा लंगडत लंगडत चालू लागला.

लंगडताना एका दगडावर त्याचा पाय आपटल्यामुळे स्वार घोड्यावरून खाली पडला व तो शत्रूच्या हाती सापडताच शत्रूने लगेचच त्याला मारले.

- तात्पर्य : जेव्हाचं काम तेव्हा न करता ते आळसाने पुढे ढकलणे ही सवय वाईट व घातक आहे.

महासत्तापदाचे स्वप्न रंगवणारा भारत प्रत्यक्षात नागरिकांच्या दैनंदिन जीवनमानात घसरण अनुभवत आहे, ही वस्तुस्थिती आता दुर्लक्षित करता येणार नाही.

# विकासग्रस्तांची विदारक वाताहत



विशेषतः महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात पायाभूत सुविधांच्या नावाखाली सुरू असलेला अव्यवस्थित विकास चिंताजनक आहे. विकासाच्या घोषणांपेक्षा नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवाला अधिक महत्त्व असते, आणि तो अनुभव आज त्रासदायक बनला आहे.

मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत पाच-पाच तास वाहतूक कोंडी होणे, पुण्यामध्ये अपुरे नियोजन आणि बोंबललेले प्रकल्प दिसणे, हे केवळ अपघाती नाही. ही परिस्थिती सत्ताधाऱ्यांची दृष्टी, प्रशासनाची उदासीनता आणि कंत्राटी व्यवस्थेतील अपारदर्शकता यांचे परिणाम आहेत. 'समृद्धी महामार्ग', मेट्रो, स्कायवॉक किंवा पॉड टॅक्सी यांसारख्या प्रकल्पांचा गाजावाजा मोठा; पण त्यांच्या उपयोगितेचा व सुसंगततेचा अभाव प्रकर्षाने जाणवतो.

विकासाचा खरा अर्थ म्हणजे नागरिकांचे जीवन सुलभ करणे. मात्र, आज उलट परिस्थिती आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था खिळखिळी होत असताना खासगी कंत्राटांना प्राधान्य दिले जाते. BESTसारख्या विश्वासार्ह सेवेकडे दुर्लक्ष होते, तर नव्या योजनांमध्ये आर्थिक हितसंबंध डोळ्यासमोर ठेवले जातात. परिणामी, नागरिकांना मूलभूत सोयींसाठीही संघर्ष करावा लागतो.

याशिवाय, शहर नियोजनाचा पूर्ण अभाव ही गंभीर बाब आहे. अरुंद रस्ते, वाढती लोकसंख्या आणि त्यात उभारल्या जाणाऱ्या उंच इमारती यामुळे आपत्ती व्यवस्थापनही कठीण बनले आहे. अग्निशमन दल, रुग्णवाहिका यांना वेळेवर पोहोचणे अशक्य होईल, अशी स्थिती निर्माण होत आहे. तरीही 'विकास' या नावाखाली हे निर्णय पुढे ढकलले जात आहेत.

विकासाच्या या मॉडेलमुळे सामाजिक विषमता वाढत आहे. शहरांमध्ये कोंडी, प्रदूषण आणि ताणतणाव वाढत असताना ग्रामीण भाग विकासाअभावी मागे पडत आहेत. म्हणजेच, ना शहरे राहण्यायोग्य उरली आहेत, ना खेडी सक्षम होत आहेत.

आज गरज आहे ती केवळ मोठ्या प्रकल्पांची नव्हे, तर सुयोग्य नियोजन, पारदर्शकता आणि नागरिककेंद्रित धोरणांची. अन्यथा, 'विकास' हा शब्द केवळ घोषणांपुरताच उरेल आणि सामान्य माणसाचे जगणे अधिकच कठीण होत जाईल. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने तरी या वास्तवाचा प्रामाणिक विचार होणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।
रविशशिकळा लोपलिया ॥१॥

कस्तुरीमळवट चंदनाची उटी ।
रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मुख्यमंत्र्यांनी जनतेची माफी मागावी!

## नसरापूर बलात्कार प्रकरणी खासदार संजय राऊतांची सरकारवर बोचरी टीका

**महाईन्यूज । मुंबई**

**पुण्यातील नरसापूर येथे एका चार वर्षीय चिमुकलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पुण्यात काल विविध ठिकाणी आंदोलने आणि निषेध मोर्चे झाले. मध्यरात्री नवले पुलावर प्रचंड जनक्षोभ उसळला होता. पोलिसांनी बळाचा वापर करत सुमारे चार ते पाच तासांनी हा पूल मोकळा केला. यावरून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे.**





### नेमकं प्रकरण काय?

भोर तालुक्यातील नसरापूर या ठिकाणी चार वर्षांच्या मुलीवर एका ६५ वर्षीय नराधमाने अत्याचार करून तिची दगडाने ठेचून हत्या केली. आरोपीने तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली ठेवला होता. ही घटना उघडकीस आल्यानंतर त्याचे संतप्त पडसाद उमटले.

कायदा सुव्यवस्थेचं वाटोळं झालं आहे, अशा शब्दांत संजय राऊतांनी सरकारवर टीकास्त्र डागलं. “गृहमंत्री म्हणून जी कर्तव्य पार पाडायला हवीत ती पार पाडली जात नाहीत. सातत्याने मुलींवरील अत्याचाराची प्रकरणे समोर येत आहेत. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे वाढली आहेत. मुख्यमंत्री २४ तास राजकारणात अडकले आहेत”, असं संजय राऊत म्हणाले.

ते पुढे म्हणाले, “काल मिसिंग लिंकच्या उद्घाटनाच्या वेळी ट्राफिक जाम झाले, लोकांचे हाल झाले. मुख्यमंत्र्यांनी विनम्रपणे माफी मागितली. कालच्या (नसरापूर बलात्कार प्रकरण) प्रकरणाबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे. मुलींवरील, महिलांवरील अत्याचारसंदर्भात माफी मागायला पाहिजे. त्या कालच्या दुर्दैवी मुलीची आई कदाचित सरकारची लाडकी बहीण असेल, तिच्या खात्यात १५०० रुपये फडणवीस टाकत असतील. त्या बहिणीच्या मुलीवर अशाप्रकारे बलात्कार आणि हत्या करण्याचा अधिकार दिला आहे का?” असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला.

“हे या राज्यात सुरू आहे. या महाराष्ट्रातील आणि भगिनींनी सरकारविरोधात बंड केलं पाहिजे. या सरकारला जाब विचारला पाहिजे. विरोधी पक्षाने रस्त्यावर उतरलं पाहिजे. हे राज्य आता सामान्य माणसाला राहण्यालायक उरलं नाही. पैशांचा माज, पैशांची मस्ती आणि सत्ता यावर सरकार चाललं आहे. धाक नसल्याने अत्याचार सुरू आहेत. याला देवेंद्र फडणवीस जबाबदार आहेत”, असंही ते पुढे म्हणाले.

## धारावीत तळ मजल्याच्या पात्रतेवरच वरच्या मजल्यावरील पात्रत्ता निश्चित होणार!

**महाईन्यूज । मुंबई**

**झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील आतापर्यंतच्या निकषांना छेद देत,धारावी पुनर्विकास प्रकल्पात वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना देखील घर देण्याचा निर्णय राबविण्यात येणार आहे. मात्र, वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची पात्रता ही मुख्यत्वे तळमजल्यावरील सदनिकाधारकाच्या पात्रतेवर अवलंबून असणार आहे.**



४ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार १५ नोव्हेंबर २०२२ पूर्वी धारावीत वास्तव्याला असलेल्या वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना देखील पुनर्विकासात सामावून घेतले जाणार आहे. या सदनिकाधारकांना धारावीबाहेर, मात्र मुंबई महानगरप्रदेशात (एमएमआर) ३०० चौरस फुटांचे घर दिले जाणार आहे. त्यासाठी त्यांना भाडेकरार – खरेदी योजनेचा लाभ घेता येईल. २५ वर्षांसाठी नाममात्र भाडे भरून २६ व्या वर्षी घराचा मालकी हक्क मिळवता येईल. तसेच उर्वरित रक्कम अदा करून २५ वर्षांच्या कालावधीत कधीही घराचे मालक होता येईल, असे धारावी पुनर्विकास प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना कोणताही लाभ न देता प्रकल्पातून वगळले जाते. मात्र, धारावी पुनर्विकास प्रकल्प त्यास अपवाद आहे. वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना पुनर्विकासात सामावून घेणारा हा देशभरातील पहिला प्रकल्प आहे, असे धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) अधिकाऱ्याने सांगितले.

हायर-परचेस धोरणातील महत्त्वपूर्ण तरतुदींमुळे धारावीकरांना हक्काचे घर सहजरित्या खरेदीही करता येणार आहे. भाडेकराराची उर्वरित रक्कम भरून हाल तेव्हा घराचा मालकी हक्क धारावीकरांना मिळवता येणार आहे.

पुनर्विकासाचा लाभ घेण्यासाठी वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांना, अंतिम मुदतीपूर्वीच्या (कट ऑफ डेट) वास्तव्याचा पुरावा सादर करावा लागेल. त्यासाठी,४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार दस्तावेजांची पूर्तता करावी लागेल.

पात्रतेच्या प्राधान्यक्रमातील शेवटच्या पर्यायात जर तळमजल्यावरील सदनिकाधारक आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न करता आपली पात्रता सिद्ध करू शकला नाही, तर वरच्या मजल्यावरील सदनिकाधारकांची पात्रता देखील धोक्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत पात्रतेसाठी कोणतेही प्रतिज्ञापत्र विचारात घेतले जाणार नाही, अशी माहिती या अधिकाऱ्यांनी दिली. वरच्या मजल्यावरील बहुतांशी सदनिकाधारक अशा प्रकारची प्रतिज्ञापत्र सादर करत असल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणली. वरच्या मजल्यावरील पात्रतेसाठी आवश्यक असलेल्या सुरुवातीच्या चार प्राधान्यक्रमांपैकी त्यांच्याकडे कोणतेही दस्तावेज उपलब्ध नाहीत,याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

काही प्रकरणांमध्ये प्राधिकरणाकडे वरच्या मजल्यावरील एफ-1 आणि एफ -2 अशा युनिट्सची कागदपत्रेही आली आहेत. याबाबत माहिती देताना डीआरपी अधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले की, “शासन निर्णयानुसार जर झोपडीच्या वर अनेक मजले अस्तित्वात असतील, तर प्रत्येक मजल्यावरील कुटुंबप्रमुखाने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. मात्र, जर हे वरचे मजले आणि तळमजला हे एकच युनिट मानले, तर प्राधान्यक्रमांक-5 अन्वये प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे,ज्यामध्ये वरच्या मजल्यावरील मजला क्रमांक आणि वास्तव्याचा कालावधी याबाबत तळमजल्यावरील सदनिकाधारकाकडून प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे”

शासन निर्णयानुसार, पुनर्विकासात प्रत्येक कुटुंबाला एकच घर मिळणार असून एकाच कुटुंबातील पती, पत्नी आणि मुलांना स्वतंत्रपणे अर्ज दाखल करता येणार नाहीत. तसेच, मुंबई महानगर प्रदेशातील इतर कोणत्याही गृह योजनेचा लाभ घेतलेल्या व्यक्तींना धारावी पुनर्वसन प्रकल्पाचा लाभ घेता येणार नाही.

# रस्त्यावरील दहीवड्यातून विषबाधा!

## ओडिशात २७ मुलांसह ५८ जणांना उलट्या अन् ताप; तपासासाठी ३ पथके तैनात

**महाईन्यूज । ओडिशा**

**मुंबईतील पायधुनी येथे बिर्याणी आणि कलिंगड खाल्यानंतर एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच ओडिशाच्या जाजपूर जिल्ह्यातही अन्नबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत २७ मुलांसह किमान ५८ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर राज्य सरकारने विविध यंत्रणांमार्फत चौकशी सुरू केली आहे.**




दशरथपूर ब्लॉकमधील पातापूर गावात शुक्रवारी (१ मे) रस्त्यावरील एका विक्रेत्याकडून स्थानिक पदार्थ खाल्यानंतर ग्रामस्थांची प्रकृती बिघडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाधितांनी 'कटक दहीवडा' खाल्ला होता आणि त्यानंतर लगेचच त्यांना उलट्या आणि तापासारखी लक्षणे जाणवू लागली. या अचानक उद्भवलेल्या संकटामुळे गावात घबराट पसरली. सर्व बाधितांना तातडीने जवळच्या वैद्यकीय केंद्रात हलवण्यात आले. त्यांना दशरथपूर सामुदायिक आरोग्य केंद्र आणि जाजपूर जिल्हा मुख्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, तिथे डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केले आहेत. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अनेक रुग्णांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे.

जाजपूरचे जिल्हाधिकारी अंबर कुमार कर यांनी सांगितले की, २१ जणांना प्रकृतीत सुधारणा झाल्याने डिस्चार्ज देण्यात आला आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री मुकेश महालिंग यांनी जिल्हा मुख्यालय रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आणि रुग्णांशी संवाद साधला. “२७ मुलांसह एकूण ५८ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. प्राथमिक अहवालानुसार, 'दहीवडा' खाल्याने हा प्रकार घडला असावा. आम्ही खाद्यपदार्थ आणि पाण्याचे नमुने गोळा करून ते तपासणीसाठी पाठवले आहेत,” असे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

नंतर 'X' वर दिलेल्या अपडेटमध्ये त्यांनी म्हटले की, “आज जाजपूर जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा मुख्यालय रुग्णालयाला भेट देऊन उपचार घेत असलेल्या रुग्णांची विचारपूस केली आणि त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. राज्य सरकारने या घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तीन स्वतंत्र पथके स्थापन केली आहेत. उपचार घेत असलेल्या रुग्णांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा मिळेल याची खात्री करण्यासाठी सरकार आवश्यक पावले उचलत आहे,” असेही महालिंग यांनी नमूद केले. तपास सुरू असून चाचणी अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

## ‘नाकेबंदी हटवा, नुकसान भरपाई द्या’, इराणचा अमेरिकेला नवा १४ कलमी शांतता प्रस्ताव

**महाईन्यूज । इराण**

**अमेरिका-इराणमधील युद्धाचा वणवा पुन्हा पेटणार की युद्ध संपणार? याबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे. कारण अमेरिका-इराणमधील युद्ध संपवण्याबाबत अजून कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. पाकिस्तानच्या माध्यमातून शांतता करारासाठी हालचाली सुरू आहेत. पण दुसऱ्या फेरीत देखील युद्धाबाबत ठोस तोडगा निघत नसल्याचं दिसून येत आहे. यातच अमेरिकेने काही दिवसांपासून होर्मुझ सामुद्रधुनीत नाकाबंदी सुरू केलेली आहे. त्यामुळे होर्मुझ सामुद्रधुनीत तणावाची परिस्थिती असल्याने होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या जागतिक व्यापाराला अडथळे निर्माण होत आहेत. याचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे.**




अशा परिस्थितीतही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करत इराणला इशारा देत असल्याने हे युद्ध पुन्हा भडकणार का? याबाबत सवाल उपस्थित केले जात आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याची माहिती समोर आली आहे. पाकिस्तानच्या माध्यमातून इराणने हा प्रस्ताव दिला असून तात्पुरत्या युद्धविरामाऐवजी युद्ध पूर्णपणे संपवण्याची इच्छा व्यक्त केल्याची माहिती सांगितली जात आहे. या संदर्भातील वृत्त इराणमधील माध्यमांनी दिलं आहे.

इराणने अमेरिकेला युद्ध थांबवण्यासाठी १४ कलमी नवा शांतता प्रस्ताव दिल्याचं वृत्त इराणच्या प्रसारमाध्यमांनी दिलं आहे. वृत्तानुसार, इराणने अमेरिकेकडे अशी मागणी केली की, 'लेबनॉनसह सर्व युद्ध थांबवावं, नौदल नाकेबंदी हटवावी, संपूर्ण सैन्य मागे घ्यावं, इराणवरील सर्व निर्बंध हटवावेत, इराणची गोठवलेली मालमत्ता परत करावी, युद्धात झालेल्या नुकसानाची भरपाई द्यावी', अशा विविध १४ अटी इराणने अमेरिकेला दिलेल्या प्रस्तावात ठेवल्या आहेत.

दरम्यान, इराणने अमेरिकेच्या दोन महिन्यांच्या युद्धविरामाच्या योजनेला विरोध केला आहे. इराणचे उप परराष्ट्र मंत्री काझेम गरीबाबादी यांनी म्हटलं की,”वाटाघाटीतून तोडगा काढायचा की पुन्हा युद्धाकडे वळायचं हे अमेरिकेवर अवलंबून आहे. इराण दोन्हीसाठी तयार आहे.”

### इराणच्या प्रस्तावावर अमेरिकेची भूमिका काय?

इराणने अमेरिकेचा पाठिंबा असलेल्या ९-मुद्द्यांच्या प्रस्तावाला १४-मुद्द्यांच्या विस्तृत योजनेद्वारे अधिकृतपणे उत्तर दिलं आहे. पाकिस्तानी मध्यस्थाच्या माध्यमातून पाठवण्यात आलेला हा प्रतिसाद तात्पुरत्या युद्धविरामाच्या पलीकडे जाऊन संघर्षावर सर्वसमावेशक तोडगा काढण्याचा इराणचा मानस दर्शवतो. यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं की, “इराणच्या बाबतीत आमची कामगिरी खूप चांगली आहे. त्यांना एक करार करायचा आहे. त्यांचा नेता कोण असेल हे ठरवणं त्यांना अवघड जात आहे. मी याचा विचार करत आहे. त्यांनी मला कराराच्या संकल्पनेबद्दल सांगितलं. ते आता मला त्यांची नेमकी भूमिका सांगणार आहेत. पण इराणने अद्याप किंमत चुकवलेली नाही. इराणने नुकत्याच पाठवलेल्या प्रस्तावाचे पुनरावलोकन मी लवकरच करणार आहे. पण मला वाटत नाही की मी तो प्रस्ताव मान्य करेन, कारण गेल्या ४५ वर्षांत इराणने मानवता आणि जगासाठी जे काही केलंय, त्याची त्यांनी किंमत चुकवलेली नाही.”

आयआरआयबी (इराणची सरकारी रेडिओ आणि दूरदर्शन संस्था) च्या वृत्तानुसार, मंत्री काझेम गरीबाबादी यांनी म्हटलं की, “आता मुत्सद्देगिरीचा मार्ग निवडायचा की संघर्षात्मक भूमिका कायम ठेवायची? हे अमेरिकेच्या हातात आहे. आपलं राष्ट्रीय हित आणि सुरक्षा जपण्याच्या उद्देशाने इराण दोन्ही मार्गांसाठी तयार असेल.”

# झलकपलकची!



श्वेता तिवारीची मुलगी आणि अभिनेत्री पलक तिवारी (Palak Tiwari) हिने अल्पावधीतच इंडस्ट्रीमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. पलक ही केवळ तिच्या प्रोजेक्टमुळेच नाही तर सतत चर्चेत राहणाऱ्या तिच्या फॅशन स्टेटमेंटस् आणि बोल्ड लूकमुळेही ट्रेंडमध्ये असते. २० वर्षीय पलक तिवारी सोशल मीडियावर प्रचंड लोकप्रिय आहे. तिचे ग्लॅमरस फोटो आणि स्टायलिश लुक्स चाहत्यांचे लक्ष वेधून घेतात. नुकतेच पलकने डीप नेकलाईन असलेल्या फ्लोरल गाउनमधील काही नवीन फोटो शेअर केले असून त्यावर चाहत्यांची नजर थांबून राहिली आहे. या गाउनमध्ये पलक अक्षरशः एखाद्या राजकुमारीसारखी दिसत आहे. फोटोशूटदरम्यान पलकने अनेक वेगवेगळ्या अँगलमधून पोझ दिल्या आहेत. फ्लोरल प्रिन्सेस गाउनसोबत तिने केसांत मेसी बन केला असून तो तिच्या लूकला अप्रतिमपणे पूरक ठरत आहे. मेकअपमध्ये तिने डोळ्यांना कॅटी आयशॅडो लूक दिला आहे. आयलाईनर आणि मस्काऱ्याने डोळ्यांना डिफाईन करत, न्यूड लिपस्टिकने संपूर्ण मेकअपला परिपूर्ण फिनिश दिला आहे. पलकच्या या ग्लॅमरस अंदाजावर सोशल मीडियावर चाहते अक्षरशः फिदा झाले आहेत. तिच्या फोटोंवर चाहत्यांकडून कमेंटचा वर्षाव होत असून सर्वजण तिच्या सौंदर्याची आणि शैलीची प्रशंसा करत आहेत.







## मुकेश खन्ना लग्न करणार?

मुकेश खन्ना ६७ वर्षांचे आहेत. ते आजही अविवाहित आहेत. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्यांनी प्रेम, लग्न, जोडीदार याबद्दल वक्तव्य केले आहे. नुकतीच मुकेश खन्ना यांनी फिल्मी चर्चाला मुलाखत दिली. ते म्हणाले, "मला एकदा रवी चोपडा म्हणालेले की ज्याचे अनेक अफेअर असतात तोच पुरुष असतो, पण मी त्या गोष्टीशी सहमत नाही. त्या ग्रुपमध्ये सगळ्यांचे अफेअर होते, माझे नाही. मला वाटतं पुरुषत्व सिद्ध करण्यासाठी १० गर्लफ्रेंड असाव्यात असे काही नाही." ढे ते म्हणाले, "लोक म्हणतात की स्त्री ही पतीव्रता असली पाहिजे. पण, आजपर्यंत असे कोणी म्हटले आहे का की पुरुषांनीसुद्धा एकनिष्ठ असायला हवे. माझे हेच म्हणणे आहे; जर तुम्ही विवाहित असाल तर तुम्ही वचनबद्ध आहात, पण लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. ते म्हणतात की मी माझ्या पत्नीवर प्रेम करतो. त्यानंतर ते पत्नीचा विश्वासघात करतात, ही फसवणूक आहे." मुकेश खन्नांनी लग्न केले नाही, मात्र त्यांचा लग्नसंस्थेवर विश्वास असल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, "लोकांना वाटते की माझा लग्नसंस्थेवर विश्वास नाही, म्हणून मी लग्न केले नाही. मात्र, हे खरे नाही. माझा लग्नसंस्थेवर इतरांपेक्षा जास्त विश्वास आहे. पत्नी सहजासहजी मिळत नाही, ती नशिबात लिहिलेली असते. लग्न होणे हे नशिबात असावे लागते."

## 'लग्नाआधी गर्भवती राहिले ते बरं झालं'

# अभिनेत्री नेहा धुपिया



अभिनेत्री नेहा धुपिया आणि अभिनेता अंगद बेदी यांची लव्हस्टोरी पुन्हा चर्चेत आलीय. दोघांनीही अचानक लग्नाची घोषणा करत चाहत्यांना धक्का दिला होता. परंतु लग्नाआधीच नेहा गर्भवती असल्याचं कळल्यानं सोशल मीडियावर चर्चांना उधाण आलय. नेहाने हर्ष लिंबाचिया यांच्या पॉडकास्टमध्ये बोलताना नात्याबाबत खुलासा केलाय. नेहा धुपियानं अंगद बेदीसोबत १० मे २०१८ रोजी लग्नगाठ बांधली होती. लग्नानंतर अवघ्या पाच महिन्यात तिने एका मुलीला जन्म तिला. त्यामुळे तेव्हा लग्नाआधी प्रेग्नेंसीच्या तिच्याबाबत अनेक चर्चा रंगल्या. तिला प्रचंड ट्रोल देखील करण्यात आलं होतं. परंतु त्यावेळी त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केला. दरम्यान नेहाने पॉडकास्टमध्ये प्रेग्नेंसीबाबत खुलासा केलेला आहे. मुलाखतीत बोलताना अंगद बेदी म्हणाला की, 'मी ८ वर्ष नेहाच्या मागे होते. मी तिच्या इतक्या प्रेमात होतो की, मला काही कळायचं नाही. परंतु तिने लगेच होकार दिला नाही. ती तिच्या कामात प्रचंड व्यस्त असायची. मी तिला पहिल्यांदा ट्रेडमिलवर पाहिलं आणि तिच्या प्रेमात पडलो. ती खुप सुंदर आणि फिट दिसत होती.' पुढे बोलताना नेहा धुपिया म्हणाली की, 'मी देवाचे आभार मानते की मी लग्नाआधी प्रेग्नेंट झाले. तो एक माझ्यासाठी आशीर्वाद होता, जो आमच्या प्रेम कहानीला पुर्ण करण्याचा रस्ता बनला. आपण ज्या प्रेमाच्या शोधात असतो तो आपल्या आजूबाजूलाच असतो. परंतु आपण नेहमीच दूर कुठेतरी शोधण्याचा प्रयत्न करत असतो.'



# सिनर-व्हेरेव्ह जेतेपदासाठी लढत

## माद्रिद मास्टर्स 1000 जेतेपदासाठी थरारक अंतिम सामना

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**एटीपी टूरवरील येथे सुरू असलेल्या माद्रिद खुल्या एटीपी मास्टर्स 1000 दर्जाच्या आंतरराष्ट्रीय पुरूषांच्या टेनिस स्पर्धेत इटलीचा टॉपसिडेड जेनिक सिनर आणि जर्मनीचा अॅलेक्सझांडेर व्हेरेव्ह यांच्यात जेतेपदासाठी लढत होईल.**



या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यात टॉपसिडेड जेनिक सिनरने आर्थर फिल्सचा 6-2, 6-4 अशा सरळ सेट्समध्ये फडशा पाडत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. सिनरला आता सलग पाचव्यांदा मास्टर्स स्पर्धेतील जेतेपद मिळविण्यासाठी केवळ एका विजयाची जरुरी आहे. या स्पर्धेतील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जर्मनीच्या अॅलेक्सझांडेर व्हेरेव्हने अॅलेक्सझांडेर ब्लॉक्सचा 6-2, 7-5 असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. एटीपी टूरवरील सर्व म्हणजे 9 मास्टर्स 1000 दर्जाच्या स्पर्धांमध्ये अंतिम फेरीत प्रवेश मिळविणारा जेनिक सिनर हा चौथा टेनिसपटू आहे. यापूर्वी स्विसचा रॉजर फेडरर, सर्बियाचा जोकोविच आणि स्पेनचा नदाल यांनी हा पराक्रम केला होता. 24 वर्षीय सिनरचा हा एटीपी मास्टर्स 1000 दर्जाच्या टेनिस स्पर्धेतील हा 27 वा विजय आहे. त्याने गेल्या वर्षी पॅरिसमध्ये फ्रेंच ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकली होती. तसेच 2026 च्या टेनिस हंगामात त्याने इंडियन वेल्स, मियामी आणि मॉन्टेकार्लो टेनिस स्पर्धा जिंकल्या आहेत.



# काल मुंबईचा करेक्ट कार्यक्रम केला अन् आज IPL 2026 मधून बाहेर?

**महाईन्यूज । मुंबई**

**चेन्नई सुपर किंग्स गेल्या काही आठवड्यांपासून दुखापतींशी झुंजत आहे. काल मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात सामना रंगला. चेपॉकच्या मैदानावर हा सामना रंगला आणि सामना चेन्नईने जिंकला. चेन्नईने हा सामना 8 विकेट्सने जिंकला. या सामन्यानंतर चेन्नईला आज मोठा धक्का बसला आहे. चेन्नईचा एक खेळाडूला आता दुखापत झाली असून तो आयपीएल 2026 मधून बाहेर पडला आहे.**



वेगवान गोलंदाज Ramakrishna Ghosh दुखापतीमुळे आयपीएल 2026 च्या उर्वरित सामन्यांमधून बाहेर पडला आहे. पाच वेळच्या विजेत्या संघाने आयपीएल 2025 च्या मेगा लिलावात या अष्टपैलू खेळाडूला संघात घेतले होते. त्याने शनिवारी मुंबई इंडियन्सविरुद्ध आयपीएलमध्ये पदार्पण केले, पण दुर्दैवाने, पदार्पणाच्याच सामन्यात त्याला दुखापत झाली. सामन्यादरम्यान गुडघ्याला फ्रॅक्चर झाल्यामुळे त्याला स्पर्धेतील उर्वरित सामने खेळता येणार नाहीत.

चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यादरम्यान त्याला मैदान सोडावे लागले. रामकृष्ण घोषचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला आहे आणि त्यामुळे तो आयपीएल 2026 च्या उर्वरित सामन्यांमध्ये खेळू शकणार नाही. चेन्नई सुपर किंग्सने रविवारी याला दुजोरा दिला. चेपॉक येथे झालेल्या CSK विरुद्ध MI सामन्यादरम्यान रामकृष्ण घोषचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला. तो आयपीएल 2026 मध्ये पुढे सहभागी होऊ शकणार नाही.

चेन्नईचा संघ आधीच अनेक दुखापतींशी झुंजत आहे, ज्यात आयुष म्हात्रे आणि खलील अहमदसारखे खेळाडू स्पर्धेतून बाहेर आहेत. घोष संपूर्ण आयपीएल 2025 मध्ये बेंचवर होता. त्याने शनिवारी मुंबईविरुद्ध आपला पहिला लीग सामना खेळला. त्याने एक विकेट घेतली आणि एक अप्रतिम झेल घेतला. आपल्या आयपीएल पदार्पणात, घोषने तीन षटकांत केवळ 24 धावा दिल्या आणि एक विकेट घेतली.घोषने आपल्या आयपीएल पदार्पणातच प्रभाव पाडला, त्याने सूर्यकुमार यादवची मौल्यवान विकेट घेतली. सूर्याला स्वीपर कव्हरला झेलबाद झाला. त्याने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला पण चेंडू पुरेसा दूर मारण्यात तो अयशस्वी ठरला.

रामकृष्ण घोष हा वेगवान अष्टपैलू खेळाडू दुखापतीमुळे आयपीएल २०२६ च्या उर्वरित सामन्यांमधून बाहेर पडला असून, CSK संघाला मोठा धक्का बसला आहे. पदार्पणात त्याने ३ षटकांत २४ धावा देत १ विकेट घेतली, ज्यात सूर्यकुमार यादवची महत्त्वाची विकेट समाविष्ट होती. Mumbai Indians विरुद्ध IPL पदार्पणाच्या सामन्यातच त्याच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाल्याने त्याला मैदान सोडावे लागले.

### चेन्नई संघाच्या गोलंदाजीवर अधिक दबाव

घोषच्या दुखापतीमुळे आधीच दुखापतींनी ग्रस्त असलेल्या चेन्नई संघाच्या गोलंदाजीवर अधिक दबाव येणार असून, प्लेऑफच्या शर्यतीत संघाची खोली आणि पर्यायांची खरी परीक्षा होणार आहे. यामुळे आगामी सामन्यांत संघ व्यवस्थापनाला नव्या खेळाडूंना संधी देत संघरचनेत बदल करावे लागू शकतात.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। सोमवार ।
दि. 04 मे 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# मंत्री भेटीपूर्वी वल्लभनगर आगाराचा झटपट कायापालट!

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**देशाच्या सर्वांगीण विकासाचा पाया असलेल्या जनगणना २०२७ प्रक्रियेला शहरात सुरुवात झाली असून, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून नागरिक तसेच शासकीय व खासगी कर्मचाऱ्यांना या महत्त्वपूर्ण उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

पिंपरी-चिंचवडमधील मुख्य आगार म्हणून वल्लभनगर आगाराची ओळख आहे. अस्वच्छता, दुर्गंधी अन् सुविधांची वानवा असलेल्या आगारात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवार (दि. 30) वल्लभनगर आगाराला भेट देऊन आगाराची पाहणी केली. मंत्रिमहोदय भेट देणार म्हटल्यानंतर प्रशासनाने एका दिवसात आगार परिसराची केलेली स्वच्छता पाहून प्रवासी थक्क झाले.

राज्यमार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व परिवहनमंत्री यांनी पिंपरी-चिंचवड आगाराला भेट दिल्यानतंर आगारातील प्रवासी सेवा-सुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी चालक-वाहकांच्या समस्यांविषयी चर्चा केली.

## एकाच दिवसात स्वच्छतेचा 'मेकओव्हर'!

मंत्री प्रताप सरनाईक यांच्या पाहणीच्या पार्श्वभूमीवर वल्लभनगर आगाराचा अवघ्या एका दिवसात कायापालट करण्यात आला. स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कचराकुंड्या रिकाम्या करणे अशा उपाययोजनांमुळे प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले; मात्र हीच व्यवस्था कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रवाशांना आहोरात्र सेवा देणाऱ्या चालक-वाहक यांना विश्रांतीगृह स्वच्छ ठेवावेत, तसेच त्यांना अंघोळीसाठी गरम पाण्याची सुविधा द्यावी. कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ, शुद्ध पाण्याची सोय करावी असे विविध निर्देश त्यांनी स्थानकातील अधिकाऱ्यांना यावेळी दिले. आगारास मंत्रिमहोदयांनी भेट देणार म्हटल्यानंतर आगार परिसर स्वच्छ करण्यात आला होता.

तसेच परिसरातील कचराकुंड्या रिकाम्या करण्यात आल्या. पाणपोईच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे फलक लावण्यात आले होते. एका दिवसात परिसराचा कायापालट झाल्याचे पाहून प्रवाशांनी आश्चर्य व्यक्त केले.





# आयुक्तांची स्वगणनेतून जनगणना मोहिमेला सुरुवात

## स्वगणनेतून जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे; आयुक्तांचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**राष्ट्रीय जनगणना २०२७ प्रक्रियेला आजपासून महाराष्ट्रात औपचारिक सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वतः स्वगणना करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. तसेच या जनगणनेसाठी नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महापालिका मुख्यालय येथे १ मे महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी जनगणनेशी संबंधित HTTPS://SE.CENSUS.GOV.IN या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन सर्व ३४ प्रश्नांची माहिती ऑनलाइन भरत स्वगणना जनगणनेची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर त्यांना 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त झाला. स्वतः पुढाकार घेत स्वगणना करून त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले की, जनगणना ही केवळ आकडेवारी नसून ती देशाच्या विकासाचा पाया आहे. प्रत्येक नागरिकाने अचूक व प्रामाणिक माहिती देऊन या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे. स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ




वाचवणारी प्रक्रिया आहे. १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध असून, त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी जाऊन जनगणना प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन देखील आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले. याशिवाय, स्वगणना प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ वाचत असून प्रशासनालाही माहिती संकलन अधिक अचूक आणि जलद गतीने करता येत आहे. डिजिटल माध्यमातून होणारी ही प्रक्रिया 'डिजिटल इंडिया'च्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

## शहरात पाणी चोरीवर महापालिकेची मोठी कारवाई

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

पिंपरी-चिंचवड शहरात पाणी चोरीचा नवीन प्रकार उघडकीस आला आहे. एक अधिकृत आणि एक अनधिकृत नळजोड घेऊन अनधिकृत नळजोडाद्वारे पाणी चोरणाऱ्या शहरातील चिखली, मोरेवस्ती भागातील नळजोडधारकांना महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दणका दिला आहे. असे एकूण 42 अनधिकृत नळजोड खंडीत केले आहेत. पुन्हा अनधिकृत नळजोड घेतल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.



शहरात मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. 35 टक्के पाणी गळती, चोरी होते. वाढत्या लोकसंख्येनुसार पाणी उपलब्ध होत नसल्याने दिवसाआड पाणीपुरवठा करावा लागत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढली असून, अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

शहरातील विविध भागातून कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. हौसिंग सोसायटयाना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागाने अनधिकृत नळजोडधारक आणि नळजोडाला थेट मोटार पंप लावून पाणी उपसा करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची मागणी वाढली आहे. पाणी चोरी रोखण्यासाठी शहरातील बेकायदा नळजोडण्या शोधून त्यावर तत्काळ कारवाई करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला दिले आहेत. पाणी चोरी खपवून घेतली जाणार नाही, असे महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला आहे.

## महापौर रवि लांडगे यांचा स्वगणनेतून जनगणना २०२७ मोहिमेला शुभारंभ

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**जनगणना २०२७ या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाची महाराष्ट्रात आजपासून सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी स्वतः ऑनलाइन स्वगणना पूर्ण करून या मोहिमेचा प्रारंभ केला. नागरिकांनीही पुढाकार घेत या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.**



महापौर रवि लांडगे यांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर भेट देत आवश्यक माहिती भरून स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सर्व ३४ प्रश्नांची अचूक माहिती देत त्यांनी नोंदणी केली आणि 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त केला. त्यांच्या या कृतीमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अचूक माहितीमुळे शासनाला योग्य नियोजन करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने या उपक्रमात सहभागी व्हावे. १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत स्वगणना सुविधा उपलब्ध असून नागरिकांना घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

याशिवाय, १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन उर्वरित जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी स्वगणना करून सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

# पिंपळे सौदागरचा ‘स्पेलिंग किंग’ कियान्श शर्मा

## शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते चिमुकल्या कियान्शचा गौरव

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर पिंपळे सौदागर येथील कु.कियान्श शर्मा याने ‘MARRS INTERNATIONAL SPELLING BEE COMPETITION’ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकावून पिंपळे सौदागर तसेच शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

कु.कियान्शच्या या देदीप्यमान यशाची दखल घेत भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते त्याचा विशेष सन्मान करण्यात आला.

VIBGYOR RISE SCHOOL (पिंपळे सौदागर) चा विद्यार्थी असलेल्या कियान्शने २६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय अंतिम फेरीत हे यश संपादन केले. या स्पर्धेत जगातील विविध देशांतील हुशार विद्यार्थी सहभागी झाले होते, ज्यांना मागे टाकत कियान्शने आपले स्थान निश्चित केले.

कियान्शचा सत्कार करताना शत्रुघ्न काटे म्हणाले की, “पिंपळे सौदागरमधील एका चिमुकल्याने जागतिक स्तरावर आपल्या शहराचे आणि देशाचे नाव उज्ज्वल केले, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. कियान्शचे यश हे त्याच्या शिस्तीचे आणि मेहनतीचे फळ आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात अशा प्रकारची बुद्धिमत्ता जोपासणे कौतुकास्पद आहे. तो शहरातील इतर अनेक विद्यार्थ्यांसाठी एक मोठे प्रेरणास्थान ठरला आहे.”



या प्रसंगी कियान्शचे पालक, शिक्षक आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. सर्वांनीच त्याच्या या यशाचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


### यशाचा प्रवास

किया‍न्शचा हा प्रवास शालेय स्तरावरून सुरू झाला होता. त्यानंतर आंतरशालेय, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठीण फेऱ्या त्याने आपल्या एकाग्रता आणि चिकाटीच्या जोरावर यशस्वीरित्या पार केल्या. अखेर आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली.



# डॉ. सुशांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य पोर्ट्रेट प्रदर्शन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**







**DR. D Y PATIL VARALE संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुशांत पाटील सर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांच्या वतीने एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांनी डॉ. सुशांत पाटील सर आणि ॲड. अनुजा पाटील मॅडम यांचे आकर्षक पोर्ट्रेट तयार करून त्याचे भव्य प्रदर्शन केले.**

या कार्यक्रमात सुमारे १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एकत्रितपणे पोर्ट्रेट हातात धरून मानवंदना दिली. त्यामुळे कार्यक्रमाला भव्य आणि उत्साहपूर्ण वातावरण प्राप्त झाले.


या संपूर्ण उपक्रमाची संकल्पना संपूर्ण शिक्षकवृंद आणि विद्यार्थी यांच्या मार्गदर्शनातून साकार झाली, तसेच संस्थेचे कार्यकारी संचालक श्री. विद्यानंद मानकर सर यांच्या प्रोत्साहनामुळे हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. प्राचार्य डॉ. सुरेश माळी, प्राचार्य डॉ. सुरेश शिरभादुरकर, प्राचार्य डॉ. मेघना भिलारे, प्राचार्य श्री. राजाराम गोलगिरे, CFO रोहन पवार, हेड अकाऊंटंट श्री. संजय भोर, अकॅडेमिक डीन डॉ. योगेश गुरव, रजिस्टार श्री. नामदेव वेताळे, रजिस्टार श्री. प्रदीप खांदवे तसेच डॉ. अल्पना अडसूळ, डॉ. दीपोनिता मंडल, डॉ. अश्विनी चव्हाण, प्रो. योगेश नागवेकर यांनी या अनोख्या उपक्रमाच्या योजनेसाठी मोलाचे योगदान दिले.

पोर्ट्रेट निर्मितीमध्ये हर्षाली पवार, साक्षी भानुशाली, हेमंत पाटील, अनिशा प्रिया, श्रुती पेंढारे, सुदर्शन गोसावी, चेतन शेलार, सार्थक चव्हाण, प्रवेश दुपारे, सचिन देशमुख,आनंद कोरले, चैत्राली भोसले, चैतन्य तुपे या स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले. तसेच ३०+ समन्वयकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडण्यासाठी संस्थेचे क्रिएटिव्ह व कल्चरल डायरेक्टर श्री. श्रेयस देशपांडे, मिडिया हेड उन्मेष कोरडे, मंगेश ढोले, प्रो. पंकज धकाते, प्रो. रवी चौरसिया, प्रो. आकाश गायकवाड, स्पोर्ट्स डायरेक्टर किरण माळी, स्पोर्ट्स कॉर्डीनेटर पूनम अभंग, सिद्धू जाधव, स्टूडेंट COUNCIL हेड प्रो. सागर धनके, योगिता शिंदे यांनी विशेष मेहनत घेतली.

याच प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे संपूर्ण नियोजन प्रो. संदेश पाटील यांनी केले. या शिबिरात विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

एकूणच, हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमधील एकता, सामाजिक जाणीव आणि नेतृत्व गुणांचा उत्कृष्ट नमुना ठरला. संस्थेचे संचालक डॉ. सुशांत पाटील आणि ॲड. अनुजा सुशांत पाटील यांनी या अनोख्या भेटीसाठी सर्वांचे मनापासून आभार मानले.



PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in